## महाराष्ट्र शासन

**तात्काळ**

क्रमांक :- व्हीएलएस १००१/(५५२/२००१)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७.८.२००१

प्रति,
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

**विषय : जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, सिडको, एन-५, गुलमोहर कॉलनी, औरंगाबाद या संस्थेच्या प्राथमिक शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी मिळणेबाबत**

वरील विषयाबाबतचे अध्यक्ष, जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांचे दिनांक २७-८-२००१ चे पत्र कृपया पहावे.

२. सदर प्रकरणी खालील मुद्यांबाबतची माहिती शासनास तात्काळ पाठविण्यात यावी.

१) संस्थेच्या सदरील प्राथमिक शाळेस शासनाची परवानगी / मान्यता आहे किंवा कसे ? असल्यास कोणत्या शासन आदेशान्वये ? आदेशाचा क्रमांक व दिनांक द्यावा.

२) शाळा स्थलांतर करण्यामागचे नेमके कारण काय आहे ? संस्थेने शाळा प्रस्तावित ठिकाणी स्थलांतरीत केली आहे काय ? असल्यास केव्हापासून ?

३) मूळ ठिकाण व स्थलांतरीत ठिकाण यामधील अंतर किती आहे ?

४) स्थलांतरीत ठिकाणी संस्थेने शाळेसाठी आवश्यक ती पुरेशी जागा, खेळाचे मैदान, फर्निचर व इतर शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता केली आहे काय ?

५) स्थलांतरीत ठिकाणी शाळेच्या परिसरात असलेल्या इतर शासकीय व खाजगी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांची संख्या किती आहे व त्यामधील विद्यार्थी पटसंख्या किती आहे ?

६) मूळ ठिकाणाची / स्थलांतरीत ठिकाणाची सदरहू शाळेतील सध्याची विद्यार्थी पटसंख्या किती आहे?

७) सदरहू प्राथमिक शाळेस स्थलांतराची परवानगी दिल्यास त्याचा इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होईल किंवा कसे ?

८) शाळा स्थलांतरास परवानगी दिल्यास मूळ ठिकाणच्या सदरहू शाळेतील विद्यार्थ्यांची सोय कशी करण्यात येणार आहे ?

९) मूळ ठिकाणच्या शाळेतील सर्व शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांचे स्थलांतरीत शाळेत समायोजन करण्यात येणार आहे किंवा कसे ? दिले असल्यास त्याची प्रत पाठवावी.

१०) सदर प्राथमिक शाळेच्या स्थलांतराबाबत आपले स्पष्ट अभिप्राय काय आहेत ?

११) सदरची शाळा सध्या सुरु आहे का ?

१२) सदरच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची स्थलांतरास सहमती आहे का, असल्यास त्याबातचे हमीपत्र दिलेले आहे का ?

१३) स्थलांतरीत परिसरातील ६ ते ११ वयोगटातील विद्यार्थी संख्या

(ज. भि. पवार)
**प्रभारी कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. औरंगाबाद